# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
# कृषि नगर, अकोला - ४४४१०४

सूचना का अधिकार

Phone No. : 0724-2258372
Fax No. : 0724-2258386
E-Mail –registrar@pdkv.ac.in


वाचा- १. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०६ डिसेंबर, १९७५.
२. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र काप/०४/२०१६ दि. ०८ जानेवारी, २०१६
३. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे कुलगुरु समन्वय समितीच्या म.कृ.वि.कु.स.स. (१७३)/१३/२०१७ दि. १९ मे, २०१७
४. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२३१८/प्र.क्र.३/का.१७, दि. ०१ मार्च, २०१८
५. विद्यापीठ आदेश क्रआस्था/से.प्र.प/२०२०/३३६८ दिनांक १३.२.२०२०
६. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.काप/४१/२०२१ दि. २२ जुलै, २०२१
७. विद्यापीठ आदेश क्र.आस्था/से.प्र.प/२०२१/२००९ दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१
८. शासन निर्णय क्र.विपधो २६२०/प्रक्र१६/का१७ दिनांक ३१/०३/२०२१.
९. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.काप/२८/२०२३ दि. १६ मे, २०२३

जा.क्र. आस्था/से.प्र.प./२०२३/1059 दिनांक- ११ जुलै ,२०२३

**प्रस्तावना:-**

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठामध्ये सेवाप्रवेशोत्तर परिक्षा लागु करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र. ६ मध्ये नमुद मा. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठरावाद्वारे निर्णय घेण्यात आला. त्यानुसार १) विद्यापीठ सेवेत नामनिर्देशाने दिनांक ८ जानेवारी २०१६ नंतर (By Nomination) नियुक्त झालेले व ज्यांचे वय ५० वर्षाच्या आत आहे असे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना; २) मा. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र. ४१ दिनांक: - २२ जुलै, २०२१ नंतर पुढील पदोन्नती झालेले व ज्यांचे वय ५० वर्षापेक्षा कमी आहे अशा कर्मचा-यांना सेवाप्रवेशोत्तर परिक्षा विहीत संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले. त्यानुसार विद्यापीठ आदेश क्र.आस्था/से.प्र.प/२०२१/२००९ दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ नुसार विद्यापीठामध्ये सेवा प्रवेशोत्तर परिक्षेचे धोरण लागु करण्यात आले.

परंतु उपरोक्त संदर्भ क्र. १ मध्ये नमुद महाराष्ट्र शासन राजपत्र ६ डिसेंबर, १९७५ मधील अ.क्र. ३(d) नुसार सेवा प्रवेशोत्तरपरिक्षा आवश्यक असणा-या संवर्गामधील कर्मचा-याची तीन वर्ष सलग सेवा झाली असल्यास या परिक्षेचे बंधन नाही. तसेच अ.क्र. ३(e) नुसार सेवेत स्थायित्व प्रदान करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सदर परिक्षेचे बंधन नाही असे नमुद करण्यात आले आहे. त्यामुळे शासन राजपत्र दि.०६.१२.१९९५ व शासन निर्णय दि.३१.०३.२०२१ मध्ये विहीत तरतुदी प्रमाणे विद्यापीठाचे सेवाप्रवशोत्तर परिक्षेचे धोरणमध्ये बदल करणे अपेक्षीत आहे.

त्याअनुषंगाने दिनांक १६ मे, २०२३ रोजी मा. विद्यापीठ कार्यकारी परिषदेसमोर प्रस्ताव पुर्नविचाराकरिता सादर करण्यात आला. यावर चर्चाकरून मा. कार्यकारी परिषदेच्या उपरोक्त संदर्भांकित संदर्भ क्र.९ वर नमुद निर्णयाच्या परिणामी खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## आदेश

जा.क्र. आस्था/से.प्र.प./२०२३/ 1059 दिनांक: - ११ जुलै, २०२३

असे आदेशित करण्यात येते की, विद्यापीठ आदेश क्र.आस्था/से.प्र.प./२०२१/२००९ दिनांक:- ३० नोव्हेंबर, २०२१ नुसार विद्यापीठामध्ये लागु करण्यात आलेल्या सेवाप्रवेशोत्तर परिक्षेचे धोरणामध्ये बदल करून त्यानुसार सेवा प्रवेशोत्तर परिक्षा विनियमातील ' **पात्र परिक्षार्थी** ' या घटकामध्ये बदल करण्यात येत असून सुधारीत पात्र परिक्षार्थी घटक यासह संलग्नीत प्रमाणे विहीत करण्यात येत आहे.

सदर आदेशाची अमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत आहे.

स्वाक्षरित/-<br>कुलसचिव,<br>डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रतिलीपी:-

१.संचालक, संशोधन/विस्तार शिक्षण,डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला<br>
२.अधिष्ठाता,कृषि/अभियांत्रिकी, डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला<br>
३. सहयोगी अधिष्ठाता.......................................................................................<br>
डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला<br>
४. विभाग प्रमुख,..........................................................................................<br>
डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला<br>
५. विद्यापीठ अभियंता, डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला<br>
६. नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला<br>
७. उपकुलसचिव(साप्रवि), डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला<br>
८. वेतन व लेखाधिकारी , डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला<br>
९. मा. कुलगुरू/मा. कुलसचिव यांचे स्विय सहायक, डॉ.पं.दे.कृ.,वि.,अकोला<br>
१०...........................................................................

कुलसचिव,<br>डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## सेवा प्रवेशोत्तर परिक्षा (Post Recruitment Exam)
## विनियम (Regulation)

**I पात्र परिक्षार्थी :**

१. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव दिनांक १६ मे, २०२३ नंतर नामनिर्देशनाने/सरळसेवेने नियुक्त होणा-या तसेच ठरावाच्या दिनांकास परिविक्षा कालावधी अपुर्ण असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचा-यांना सेवा प्रवेशोत्तर परिक्षा लागु राहील.

२. विद्यापीठ सेवेत असणारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी ज्यांचे वय ५० वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक आहे आणि १५ वर्षे अखंड सेवा दिली असेल अशा कर्मचाऱ्यांना परिक्षेतुन सुट देऊन व तशी नोंद सेवा पुस्तकात घेण्यात येईल.

३. ज्या कर्मचाऱ्यांनी यापुर्वीच्या कार्यालयाचे आस्थापनेवर कार्यरत असतांना सदर परिक्षा उत्तीर्ण केली असेल व त्याची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेतलेली असेल तर, अशा कर्मचाऱ्यांना ही परीक्षा देणे बंधनकारक नाही. ज्या कर्मचा-यांनी ही परीक्षा उत्तीर्ण केली असेल त्यांनी तसे प्रमाणपत्र कार्यलयास सादर करावे व त्याची नोंद सेवा-पुस्तिकेत करण्यात यावी. (ज्या कर्मच्याऱ्यांनी ही परीक्षा उत्तीर्ण केली असुन ज्यांचे सेवा पुस्तकित तशी नोंद घेतलि आहे असे कर्मचाऱ्यांना हया परीक्षेतुन सुट देण्यात येईल. ज्यांनी परीक्षा उत्तीर्ण केले आहे परंतु सेवा पुस्तिकेत नोंद नाही अशा कर्मचाऱ्यांनी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यांची सेवा-पुस्तिकेत नोंद घेण्यात येईल.)

४. खालील संवर्गामध्ये नियुक्त होणा-या अधिकारी /कर्मचारी यांना प्रस्तुत परिक्षा बंधनकारक राहील.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | २ | सहयोगी प्राध्यापक | ३ | सहायक प्राध्यापक | ४ | विद्यापीठ ग्रंथपाल |
| ५ | उपअभियंता | ६ | सहायक कुलसचिव/ सहा. नियंत्रक | ७ | शाखाधिकारी | ८ | सहायक शाखाधिकारी |
| ९ | तांत्रिक सहायक | १० | सहा. वैद्यकीय अधिकारी | ११ | मुख्य कलाकार | १२ | वरिष्ठ संशोधन सहायक |
| १३ | सुरक्षा पर्यवेक्षक | १४ | कनिष्ठ संशोधन सहायक | १५ | पशुधन पर्यवेक्षक | १६ | कनिष्ठ अभियंता |
| १७ | वरिष्ठ लिपीक | १८ | शाखा सहायक | १९ | निर्गम सहायक | २० | ग्रंथालय सहायक |
| २१ | मुख्य तालीकाकार | २२ | प्रतिरूपलेखन सहायक | २३ | कॅशिअर | २४ | सिनीअर स्टोअर किपर |
| २५ | लघुलेखक | २६ | लघुटंकलेखन | २७ | अनुरेखक (Tracer) | २८ | आरेखक (Draftman) |
| २९ | सहायक ग्रंथपाल | ३० | विद्यार्थी कल्याण अधिकारी | ३१ | कनिष्ठ संगणक सहायक | ३२ | कलाकार |
| ३३ | कनिष्ठ तालिकाकार | ३४ | प्रक्षेत्र अधिकारी | ३५ | सर्वेअर | ३६ | फोरमन सुपरवाईझर |

५. खालील संवर्गात नियुक्त होणा-या कर्मचाऱ्यांना प्रस्तुत परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट राहील.

अ. खालील नमुद ३१ संवर्ग

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व कृषि सहायक/प्रयोगशाळा सहायक (All Agri. Asstt./Lab. Asstt.) | २ | वरिष्ठ यांत्रिक (Mechanic) | ३ | तांत्रिक तथा वीज तांत्रिक (Mechanic-cum Electrician) | ४ | प्रक्षेत्र यांत्रिक (Farm Mechanic) |
| ५ | जोडारी तथा यांत्रिक (Fitter-cum-Mechanic) | ६ | कातारी (Turner) | ७ | जोडारी (Fitter) | ८ | यंत्र कारागिर (Mechanist) |
| ९ | ओतारी (Foundryman) | १० | संधाता (Welder) | ११ | यांत्रिक तथा चालक (Mecha.-cum-Electrician) | १२ | वाहन चालक (Driver) |
| १३ | कनिष्ठ यांत्रिक (Jr. Mechanic) | १४ | सुतार (Carpenter) | १५ | लोहार (Blacksmith) | १६ | तारतंत्री (Wireman) |
| १७ | मिस्तरी (Maistary) | १८ | नळ कारागिर (Plumber) | १९ | विजतंत्री (Electrician) | २० | गवंडी (Mason) |
| २१ | पंप चालक (Pump Operator) | २२ | दृकश्राव्य चालक (Audio-Visual-Operator) | २३ | मिश्रक (Compounder) | २४ | अधिपरिचारीका (Nurse) |
| २५ | जुडणीकार (Compositer) | २६ | छपाईकार (Printer) | २७ | बाईंडर (Binder) | २८ | चलक छाया चित्रकार (Movie Cameraman) |
| २९ | अंधार खोली सहायक (Dark room Assistant) | ३० | उपकरण (Instrument Mechanic) | ३१ | तर तत्सम पदे (Equivalent Cadres) | | |

ब. विद्यापीठातील वर्ग ४ चे कर्मचारी.

क. सदर ठरावाच्या दिनांकास सेवा प्रवेशोत्तर परिक्षा आवश्यक असणा-या संवर्गामध्ये ३ वर्ष सलग सेवा पुर्ण झालेले अधिकारी/कर्मचारी.

ड. सदर ठराव पारित होण्याच्या दिनांकास किंवा यापुर्वी ज्यांच्या नियुक्तीस स्थायित्व प्रदान करण्यात आले आहे ते कर्मचारी/ अधिकारी.

६. नवनियुक्त कर्मचा-याचे रूजु दिनांकानंतर प्रवेशोत्तर परीक्षा देण्याकरीता प्रथम ज्यावेळी विभागीय परिक्षेचा अर्ज सादर करावयाची कार्यवाही सुरू होईल, ती परिक्षा संबधीत शासकीय कर्मचा-याची पहिली संधी म्हणुन गणण्यात येईल.

७. सेवा प्रवेशोत्तर परिक्षेबाबत शासन निर्णय दिनांकः- ३१ मार्च,२०२१ नुसार विहित करण्यात आलेल्या धोरणाप्रमाणे परिक्षेला बसण्याची संधी, परिक्षेला बसण्याची अनुज्ञेयता व इतर नमुद बाबी शासन धोरणप्रमाणे लागु राहतील.

८. सेवा प्रवेशोत्तर परिक्षेचे प्रयोजन कर्मचा-याची ज्या शासकीय पदावर नियुक्ती झाली आहे त्या पदावर कायम करणे ही असल्याने सदर परिक्षा उत्तिर्ण झाल्याशिवाय (अपवाद व सुट वगळता) कर्मचा-याचा परिविक्षा कालावधी पुर्ण करता येणार नाही तसेच स्थायित्व प्रदान करण्यात येणार नाही.

—X—